## निवडक

### ज्येष्ठ नागरिक कथाकथन स्पर्धा १५ रोजी डिचोली येथे तर मडगावात १६ रोजी

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. ४ :** गोवा प्रदेश साने गुरुजी कथामाला तिसरी ज्येष्ठ नागरिक कथाकथन स्पर्धा २०२५, कथा माला केंद्र डिचोली व कथा माला केंद्र मडगाव यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. कथाकथनाचा विषय, कोणतीही संस्कारक्षम कथा. कथा उदबोधक असावी. केवळ चरित्र कथन नसावं. भाषण स्वरूपात नसावी. जीवनातील एखादा प्रसंग कथेच्या स्वरूपात ६ ते ७ मिनिटांत सांगावा. कथाकथन मराठीतून असावे.उत्तर गोव्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी कथाकथन स्पर्धा मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता सेकंड इनिंग्स, ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र सोनार पेठ डिचोली येथील बँक ऑफ बरोडाच्या वर पाचवा मजला डिचोली गोवा येथे होईल. उत्तर गोव्यातील स्पर्धकांनी साने गुरुजी कथामाला अध्यक्ष श्रीकृष्ण धोंड (९३२६१००५३७) यांच्याशी संपर्क साधावा. दक्षिण गोव्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी कथाकथन स्पर्धा बुधवार दि. १६ रोजी दुपारी ३ वाजता महिला नूतन विद्यालय कोंब मडगाव येथे होईल. दक्षिण गोव्यातील स्पर्धकांनी मडगाव स्पर्धा प्रमुख अविता नाईक (९४०४७५७२२६) यांच्याशी संपर्क साधावा. प्रत्यक्ष कथाकथन स्पर्धा प्रारंभ होण्यापूर्वी पंधरा मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.विजेत्या स्पर्धकांना प्रथम १000, द्वितीय ८00 व तृतीय ७00 रुपये आणि उत्तेजनार्थ रु. ५00 प्रमाणे दोन पुरस्कार देण्यात येतील. अधिक माहितीसाठी अशोक तीळवी राजेंद्र सावईकर व शैलजा बाळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

### सावईवेरे येथील देवी लईराई धोंड भक्तगणांची उद्या बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ३ :** सावईवेरे येथील श्री देवी लईराई धोंड भक्तगणांची विशेष बैठक येत्या रविवारी दि. ६ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता येथील श्री सातेरी देवस्थानच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली आहे. या विषयावर विविध विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. तरी सर्व धोंड भक्तगणांनी बैठकीला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

---

### आदर्श सेवा फाऊंडेशनतर्फे आज अग्नी सुरक्षा कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ४ :** आदर्श सेवा फाऊंडेशनतर्फे अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालय यांच्या सहकार्याने अग्नी सुरक्षा (फायर सेफ्टी) कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून हा कार्यक्रम येत्या शनिवारी दि. ५ रोजी संध्याकाळी ४ वाजता सावईवेरे येथील पंचायत मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमाला कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, सरपंचा शोभा पेरणी, माजी सरपंच मोहन वेरेकर, उपसरपंच बाबू गावडे, पंच सदस्य अक्षय नाईक इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात आगीच्या धोक्यापासून सरंक्षणासाठी उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची दक्षता इत्यादी संबंधी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करणार येणार आहे. तरी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन फाऊंडेशनचे आदर्श तोरस्कर यांनी केले आहे.

---

### विर्डी दोडामार्ग येथे उद्या 'देवा घरचा न्याय'

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ४ :** रामनवमी उत्सवानिमित्त रविवार दि. ६ रोजी श्री सातेरी देवी सभामंडप विर्डी दोडामार्ग (केरी–विर्डी ) येथे रात्री ९ वाजता दशरथ काशिनाथ राणे लिखित,कृष्णा महादेव गावस दिग्दर्शित व काशिनाथ आत्माराम गावस निर्मित श्री सातेरी नाट्य कला मंडळ विर्डीतर्फे 'देवा घरचा न्याय' हे संगीत सामाजिक तीन अंकी नाटक सादर करण्यात येणार आहे. या नाटकात काशिनाथ गावस (पप्पाजी),सुरेश माजिक (विलास), लक्ष्मण बांदेकर (गणेश), आतिष गावस (विक्रांत), अंकुश बांदेकर (भुजंग), दिगंबर गावस (मेघनाथ), अमरदीप गावस (बाबल्या), गोपाळ माजिक (वासू ) व सुवर्णा गावकर (सुरेखा) यांच्या भूमिका असून संगीत दिग्दर्शन रवी गावस यांचे व तबला साथ जगन्नाथ गावस यांची आहे. सकाळी ८ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी १२ वाजता श्री रामजन्म आधारित नाटिका सादर होणार आहे. भाविकांनी व नाट्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### साईबाबा संस्थान कुचेली मंदिरात उद्या श्रीराम नवमी महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ४ :** श्री साईबाबा संस्थान कुचेली मंदिरात रविवार दि. ६ रोजी श्रीराम नवमी महोत्सव संपूर्ण गावातून श्री साईबाबांची पालखी भव्य निघणार आहे रविवार दि. ६ रोजी सकाळी धार्मिक विधी नंतर संस्थापक कैलासवासी मनोहर हिरू नाईक परुळेकर मापसा कुटुंबियातर्फे साजरा होणार आहे सकाळी सात वाजताची अभिषेक दुपारी महानैवेद्य दुपारी १.३० वाजता श्री साईबाबांची पालखी बँड वादकासह गावातून मिरवणूक रात्री मंदिराभोवती सुहासिनी महिलांतर्फे दीपोत्सव व पालखी प्रदक्षिणा काढण्यात येईल दि. ७ रोजी सकाळी धार्मिक विधी सत्यनारायण महापूजा दुपारी आरती महानैवेद्य सायंकाळी धुपारती मान्यवरांचा सत्कार सोहळा होणार आहे रात्र ८ वाजता कोकणी नाटक आमची वकाल वांटेड रात्री रामनवमी कार्यक्रमाची सांगता होईल.

---

### काणकोणात आज राम रथ यात्रा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ४ :** काणकोणात यंदा वर्षीप्रमाणे राम नवमी निमित्त दि. ५ रोजी, सकाळी ७.३० वाजता श्री रामाच्या मूर्तीचे प.पु. गोकर्ण मठाधीश श्री स्वामीजींच्याहस्ते पारंपरिक रितीरिवाजानुसार स्थापना व त्यानंतर सकाळी ८ वाजता राम रथ यात्रेला पर्तगाळ येथून सुरुवात होईल. तालुक्यात फिरून नंतर संध्याकाळी ४.३० वाजता परत पर्तगाळ येथील मठात समारोप होईल, असे आज दि. ३ रोजी, राजाबाई येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले. यावेळी आयोजन समितीचे पंकज नाईक गावकर, प्रतीश प्रभुदेसाई, नंदीप भगत, सूरज नाईक गावकर, अमेय पुराणीक, सुनय कोमरपंत, रत्नाकर धुरी, अशोक धुरी, प्रमोद प्रभुदेसाई, शैला प्रभुदेसाई, सुधीर कोमरपंत, विपीन प्रभुगावकर, सतीश वेल्फेअर, संजू पाडी, तेजस देसाई व दिलखूश शेट आदी उपस्थित होते. ही राम रथ यात्रा सकाळी ८ वाजता श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ येथून प्रयाण करेल व श्री परशुराम मंदिर पैंगीण येथे ८.१५ वाजता पोहोचेल. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता श्री लक्ष्मीनारायण मंदिर पैंगीण येथे तर ९ वाजता माशें येथील श्री निराकार मंदिर व ९३० लोलयें येथील केशव दामोदर मंदिर या ठिकाणी स्थानिक नागरिकांकडून ओवाळणी स्विकारेल. सकाळी १०.३० वाजता राजबाग – यातील येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर व १०.४५ वाजता पाटणे येथील श्री देवगी पुरुष मंदिर या ठिकाणी पोहोचेल. सकाळी ११.१५ वा. पाटोळे येथील श्री भुमी पुरुष मंदिर तर दुपारी १२ वाजता श्री नूतन मराठी विद्यालय देसाईवाडा, आगोंद सुहासिनीकडून ओवाळणी स्वीकारेल. दुपारी १२.३० वाजता धवळखाजन येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, तर दुपारी १ वाजता सातेरी, खोला येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर या ठिकाणी पोहोचेल. त्यानंतर १.३० वाजता मुडकूड, आगोंद येथील श्री लाखणेश्वर देवस्थानात महा आरती व महा प्रसाद वितरण व तासाभराचा अवकाश असेल. २.४५ वाजता कारागीर मळ, आगोंद येथील श्री हनुमान देवस्थानात व त्यानंतर ३.१५ वाजता गुळे, येथील श्री भुमी पुरुष देवस्थान व ३.३० वाजता श्री मारुती मंदिर चावडी, काणकोण व संध्याकाळी ४ वाजता श्रीस्थळ, काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानात पोहोचेल. त्यानंतर संध्याकाळी ४.३० वाजता श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ येथे पुजा व त्यानंतर या यात्रेची सांगता होईल. अशी माहिती प्रतीक प्रभुदेसाई

# क्रिकोकर्सच्या ५० प्लस क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड




**मडगाव, दि. ४ :** क्रिक्रोकर्स ५0 प्लस क्रिकेट बॅश स्पर्धेच्या दुसऱ्या आवृत्तीचे उद्घाटन शुक्रवारी मडगाव येथील एमसीसी मैदानावर करण्यात आले. या उद्‌घान सोहळ्याला मार्टिन्स कॉर्नरचे मालक बोनी परेरा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. सतीश कुडचडकर होते. याव्यतिरिक्त मडगाव क्रिकेट क्लबचे अध्यक्ष योगेश नाईक, एमसीसीचे सदस्य व नगरसेवक सगुण दादा नाईक, प्रयाण धामसकर व अमर देविदास हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटीचे प्रमुख रघुवीर कुंकळ्येकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर अनुप बोरकर यांनी आभार मानले.स्पर्धेच्या पहिल्या दिवशी एकूण चार सामने झाले. चिखली मैदानावर सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूरने पलक्कड व्हेटरन्स केरळ संघाचा ९ गडी राखून पराभव केला. मडगावच्या एमसीसी मैदानावर सकाळच्या सत्रातील सामन्यात रायझिंग स्टार्स व्हेटरन्स नवी दिल्लीने ओमटेक्स वेस्टर्न लायन मुंबई संघाचा २ गडी राखून पराभव केला. एमसीसीवर दुपारच्या सत्रात स्प्रिंग फाल्कन शेष भारत संघाने वेस्टर्न युनायटेडचा ४७ धावांनी तर क्रिकोकर्स गोवाने आर्लेम मैदानावर धारवाड क्रिकेट अकादमीचा ३ गडी राखून पराभव केला.

**संक्षिप्त धावफलक**

चिखली मैदान : पलक्कड व्हेटरन्स केरळ – १९.४ षटकांत सर्वबाद ५८ (राज शेट्टी १0, रवींद्रन आर. १0, चंद्र प्रकाश ७–२, दिनेश शर्मा ८–२) पराभूत वि. सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूर – ९ षटकांत १ बाद ६२ (नासिर अली नाबाद ४१, सुखदेव घुम्मान १२, पीके रमण १३–१). एमसीसी मडगाव – ओमटेक्स वेस्टर्न लायन मुंबई – २० षटकांत ६ बाद १९३ (मकरंद कुलकर्णी ५४, संदीप शिंदे नाबाद ४०, सारंग डेगवेकर ३०, शेखर पाठक २०–२) पराभूत वि. रायझिंग स्टार्स व्हेटरन्स नवी दिल्ली – १९.५ षटकांत ८ बाद १९५ (विश्वजीत नायक ५२, राजवंश रैना ३५, राजू अरोरा नाबाद २३, गुरदीपसिंग जगदेव १६–२, विजय पटेल २६–२). एमसीसी मडगाव – स्प्रिंग फाल्कन शेष भारत –२० षटकांत ९ बाद १४९ (राजेश गिल ४२, हरी १७, नीलेश नाईक १६, मनोज ओझा १४–२, दिलीप कामत २२–२) विजयी वि. वेस्टर्न युनायटेड –१६.५ षटकांत सर्वबाद १०२ (मनोज ओझा ४२, दिलीप कामत २७, रत्तन शर्मा १३–३, बिजू नायर २२–२, नीलेश नाईक ८–२, अच्युत मळाकर ११–२).

आर्लेम मैदान – धारवाड क्रिकेट अकादमी धारवाड – २० षटकांत ७ बाद १३६ (संजय इंगळे २५, प्रदीप गोडबोले २१, विपुल कालेकर २५–२) पराभूत वि. क्रिकोकर्स गोवा – १८ षटकांत ७ बाद १३८ (बाळकृष्ण होडारकर ५१, अनुप कुडचडकर ३४, अंबे पर्वतकर नाबाद १८, प्रदीप गोडबोले १७–२, श्रीनिवास ९–२).

# आयसीसी टी–२० क्रमवारीत जेकब डफी अव्वल स्थानावर

**नवी दिल्ली, दि. ४ :**



न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज जेकब डफी आयसीसी टी–२० क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. डफीने पाकिस्तानविरुद्धच्या घरच्या टी२० सामन्यात शानदार कामगिरी केली. वेस्ट इंडिजचा डावखुरा फिरकी गोलंदाज अकील होसेनला बाद करून डफीने नंबर–१ चा किताब मिळवला आहे. त्याने पाकिस्तानविरुद्धच्या २ टी२० सामन्यांमध्ये ५ विकेट्स घेतल्या आणि त्याच्या संघाला मालिका जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

डफीने चार स्थानांनी झेप घेतली आहे. त्याने ७२३ गुण मिळवले आहेत. तर अकील दुसऱ्या स्थानावर आहे. त्याचे ७१४ गुण आहेत. भारताचा फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती (७०६ रेटिंग) देखील एका स्थानाने घसरला आहे आणि आता तो दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरला आहे.

इंग्लंडचा आदिल रशीद, श्रीलंकेचा वानिंदू हसरंगा आणि ऑस्ट्रेलियाचा ॲडम झांपा हे देखील प्रत्येकी एका स्थानाने घसरले आहेत. रशीद चौथ्या स्थानावर आहे तर हसरंगा पाचव्या स्थानावर घसरला आहे. झंपा सहाव्या क्रमांकावर गेला आहे. यानंतर, ७ व्या क्रमांकावरून १० व्या क्रमांकावर असलेल्या गोलंदाजांच्या स्थानांमध्ये कोणताही बदल झालेला नाही.


डफीने पाकिस्तानविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेत १३ विकेट्स घेतल्या. ज्यामध्ये एका सामन्यात त्याने १४ धावा देऊन ४ विकेट घेतल्या. तर न्यूझीलंडने मालिका ४–१ ने जिंकली.

२०१८ नंतर, न्यूझीलंडचा एक गोलंदाज टी–२० मध्ये अव्वल स्थानावर पोहोचला आहे

२०१८ नंतर टी–२० मध्ये अव्वल क्रमांकावर पोहोचणारा डफी हा न्यूझीलंडचा पहिला गोलंदाज ठरला आहे. २०१८ मध्ये ईश सोधी टी–२० मध्ये अव्वल क्रमांकावर पोहोचला होता. डफीने २०२० मध्ये न्यूझीलंडविरुद्ध टी२० मध्ये पदार्पण केले. त्याने आतापर्यंत खेळलेल्या २३ सामन्यांमध्ये ३२ विकेट्स घेतल्या आहेत.

# मोहसिन नक्वी आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष

**नवी दिल्ली, दि. ४ :**



पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना आशियाई क्रिकेट परिषदेचे नवे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. नक्वी हे श्रीलंका क्रिकेटचे अध्यक्ष शम्मी सिल्वा यांची जागा घेतील. नक्वी हे २ वर्षांसाठी या पदावर राहतील.

गुरुवारी एसीसीची ऑनलाइन वार्षिक बैठक झाली. त्यानंतर नेतृत्व बदलाची घोषणा करण्यात आली. यावर्षी, टी–२० आशिया कप देखील सप्टेंबरमध्ये होणार आहे.

गुरुवारी झालेल्या बैठकीनंतर एसीसीने अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले, ज्यामध्ये म्हटले आहे की, श्रीलंकेला हरवून पाकिस्तानने एसीसीचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. पाकिस्तान आता आशियामध्ये क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी काम करेल. पाकिस्तानसोबत आशियामध्ये क्रिकेटला एका नवीन दिशेने नेण्याचा प्रयत्न असेल.

एसीसी अध्यक्ष म्हणून मोहसिन नक्वी यांच्यासमोर पहिले मोठे आव्हान यावर्षीचा पुरुषांचा आशिया कप असेल. ही स्पर्धा सप्टेंबरमध्ये भारतात होणार होती. तथापि, आता भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय संबंधांमुळे ही स्पर्धा तटस्थ ठिकाणी खेळवली जाईल.

ही स्पर्धा कोणत्या देशात आयोजित करायची हे नक्वी ठरवतील. ज्यामध्ये भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त आणखी ४ संघ सहभागी होतील. ही स्पर्धा युएईमध्ये होऊ शकते, परंतु श्रीलंका देखील यजमानपदाच्या शर्यतीत आहे. तटस्थ ठिकाण लक्षात घेऊन आशिया कपचे मीडिया हक्क गेल्या महिन्यात विकण्यात आले.

# बांदोडकर 'टेनिस ओपन २०२५'ला सुरुवात

▶ **दिमित्रीची उपांत्यपूर्व फेरीत दमदार घोडदौड**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** पणजी जिमखाना येथे सुरू झालेल्या दुसऱ्या बांदोडकर पणजी जिमखाना टेनिस ओपन स्पर्धेने राज्यभरातील खेळाडूंना एकत्र आणले आहे. शुक्रवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत ४५+ पुरुष एकेरी गटात दिमित्री स्मरनॉव्हने आक्रमक खेळ करत उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. स्पर्धेच्या उप– उपांत्यपूर्व फेरीत दिमित्रीने अनुप सरदेसाईचा ६–0 असा पराभव केला.




त्याआधी, अनुपने दिमित्रीशी होणाऱ्या सामन्यापूर्वी विनोद चंद्राचा ६–४ असा पराभव केला होता. ४५+ पुरुष एकेरी गटातील इतर सामन्यांमध्ये, जेम्स दरबारने ब्रायन फर्नांडिसचा ६–२ असा पराभव करत पुढील फेरी गाठली. रोहन लोटलीकरनेही सुनील सिग्नापूरकरविरुद्ध सहज विजय मिळवत सामना ६–१ ने जिंकला. शुबर्ट कोलाको आणि नवीन कार्दोजो यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर पूर्ण वर्चस्व गाजवत, अनुक्रमे सूरज पोम्ब्रा आणि अखिल पवित्रान यांना ६–0 ने पराभूत केले.

मास्टर्स ४५+ एकेरी टेनिस स्पर्धेच्या पहिल्या दिवशी प्रेक्षकांना चुरशीचे सामने पाहायला मिळाले. केदार तारीने नीनद देसाईच्या जबरदस्त आव्हानावर ७–६(५) अशी नाजूक मात करत आपले वर्चस्व सिद्ध केले. दुसऱ्या एका थरारक सामन्यात, नवीन दैवज्ञने टायब्रेकमध्ये सुधीर बावकरवर ७–६(७) असा विजय मिळवत पुढच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.

या दिवसातील एकमेव दुसरा सामना निकुंज गुप्ता आणि सौरभ खन्ना यांच्यात खेळला गेला. निकुंजने ६–४ असा विजय मिळवत दमदार सुरुवात केली. ४ एप्रिलपासून सुरू झालेल्या या राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेसाठी यंदा विक्रमी २६६ प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. गोव्याचे पहिले मुख्यमंत्री, दिवंगत दयानंद बांदोडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही स्पर्धा आयोजित केली जाते. यंदाची स्पर्धा १३ एप्रिल रोजी अंतिम सामन्याने होणार आहे.

# 'उबतोलो कापूस' तियात्रास द्वितीय बक्षीस प्राप्त

▶ **'उबतोलो कापूस' तियात्रास द्वितीय बक्षीस प्राप्त**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ४ :** गोवा कला अकादमी आयोजित ५0 व्या अखिल गोवा तियात्र 'ए' गट स्पर्धेत माची मोगी कल्चर सांस्कृतिक संस्था मोरजी यांचे व आलेक्सिन फर्नांडिस लिखित व दिग्दर्शित वाऱ्यार 'उबतोलो कापूस' या तियात्रास द्वितीय बक्षीस प्राप्त झाले. या संस्थेस रोख रु. ७५ हजार प्राप्त झाले.



या स्पर्धेत वैयक्तिक गटात बेस्ट ल्यिरीक्स पिटर फर्नांडिस, उत्कृष्ठ बाल कलाकार स्त्री मेलीटा, उत्कृष्ठ जोडी गायक पिटर व जीनॉय, बेस्ट कॉमेडी सोलो रायन व बेस्ट ट्रीओ गटात कॉनी, फ्रेझर व एलिना याना प्रथम बक्षिसे देण्यात आली. या तियात्रास द्वितीय बक्षिसे उत्कृष्ठ डायरेक्सन अलेक्सिन डी मोरजीम व उत्कृष्ठ गायक पिटर फर्नांडिस यांना जाहीर झाली. प्रशस्तीपत्र प्राप्त कलाकार अभिनय लेस्टर, निगेटिव्ह रोल – सिरिल फर्नांडीस, बँड– सिनोन, बाल कलाकार –(पुरुष) जीनॉई, (स्त्री) मेलिटा,बेस्ट सिंगर बाल कलाकार– जीनॉय, उत्कृष्ठ ड्यूओ गायक – आलेक्सिन व लॉर्णा फर्नांडिस व उत्कृष्ठ कॉमेडियन अलेक्सिन डी मोरजीम याना देण्यात आले.

या स्पर्धेत मोरजीम गटाला प्रथम पाच, द्वितीय २ व मेरिट ९ बक्षिसे प्राप्त झाली.

परीक्षक तिओतीनिओ डिसोझा, युसिको परेरा व कार्मिन बर्बोझा यांनी काम पाहिले.

दरम्यान, मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी मोरजी ग्रुपचे अभिनंदन केले व तियात्र कला राज्य पातळीवर नेऊन घवघवीत यश संपादन केल्याबद्दल अभिनंदन केले.

दरम्यान, माची मोगीं कला सांस्कृतिक संघाने राज्यस्तरीय तियात्र स्पर्धेत दबदबा निर्माण केला व उल्लेखनीय यश प्राप्त केल्याबद्दल मोरजी, मांद्रे व हरमल भागातील मित्रमंडळीनी जोरदार अभिनंदन केले आहे.

# केकेआरने रचला इतिहास

**१२० धावांवर १६.४ षटकांत सर्वबाद | अंगक्रिश रघुवंशीची अर्धशतकी खेळी**

कोलकता, दि. ४ : कोलकाता नाईट रायडर्स संघाने ईडन गार्डन्सच्या मैदानावर पुन्हा एकदा सनरायझर्स हैदराबादला पराभवाचा मोठा धक्का दिला आहे. हैदराबादला केकेआरने ८० धावांनी सर्वात मोठा विजय मिळवला आहे. हैदराबादचा आयपीएल इतिहासातील हा सर्वात मोठा पराभव आहे. इतक्या मोठ्या धावसंख्येच्या फरकाने पहिल्यांदाच पराभूत झाला आहे. केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ अवघ्या १२० धावांवर १६.४ षटकांत सर्वबाद झाला.

कोलकाताचा चार सामन्यांमध्ये हा दुसरा विजय आहे. तर हैदराबादने सलग तिसरा सामना गमावत पराभवाची हॅटट्रिक साधली आहे. पुन्हा एकदा केकेआरने हैदराबादच्या सलामीवीरांना माघारी धाडले आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. हैदराबादची टॉप ऑर्डर कोसळल्यानंतर संघ पुन्हा सावरू शकला नाही आणि परिणामी त्यांना



मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघाची सुरूवात इतकी खराब झाली की संघ शेवटपर्यंत या धक्क्यांमधून सावरू शकला नाही. केकेआरकडून इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या वैभव अरोराने पहिल्याच षटकात कहर केला. त्याच्या पहिल्या चेंडूवर हेडने चौकार मारला आणि पुढच्याच चेंडूवर त्याला झेलबाद करवत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हर्षित राणाने अभिषेक शर्माला २ धावांवर असताना झेलबाद केले. तर इशान किशनही झेलबाद झाला.

नितीश कुमारने पुन्हा एकदा निराश केलं आणि तो १९ धावा करत बाद झाला. तर कामिंदु मेंडिस २७ धावा, हेनरिक क्लासेनने ३३ धावांची सर्वात मोठी खेळी केली पण तो संघाला शेवटपर्यंत थांबत विजयापर्यंत नेऊ शकला नाही. तर पॅट कमिन्स १४ धावा करत बाद झाला. केकेआरच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजीवर आळा घातला. वैभव अरोरा आणि वरूण चक्रवर्ती यांनी ३–३ विकेट घेतले. तर आंद्र रसेलने २ विकेट तर हर्षित राणा आणि सुनील नरेनने १ विकेट घेतली.

तत्त्पूर्वी नाणेफेक गमावत केकेआरचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. केकेआरची सुरूवातही खराब झाली होती. क्विंटन डि कॉक आणि सुनील नरेन स्वस्तात बाद झाले होते. पण अजिंक्य रहाणे आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्या भागीदारीने संघाचा डाव सावरला. अंजिक्य रहाणेने २७ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तर अंगक्रिश रघुवंशीने ३२ चेंडूत ५ चौकार आणि २ षटकारांसह ५० धावांची खेळी केली.

वेंकटेश अय्यर जो सुरूवातीच्या सामन्यांणमध्ये फेल ठरला होता त्याने या सामन्यात २९ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांच्या मगतीने ६० धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर रिंकू सिंग १७ चेंडूत ४ चौकार आणि एका षटकारासह ३२ धावा करत नाबाद परतला. रिंकू आणि वेंकटेशने मिळून अखेरच्या ४ षटकांमध्ये ६६ धावा केल्या. हैदराबादकडून शमी, कमिन्स, झीशान अन्सारी, हर्षल पटेल आणि कामिंदू मेंडिस यांनी १–१ विकेट घेतली. या पराभवासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत अखेरच्या स्थानी पोहोचला.

# नॅशनल डेफ सीनियर स्विमिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये आहिल शेखचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ४ :** अहिल शेखने २६ ते २९ मार्च २०२५ या कालावधीत केरळमधील तिरुवनंतपुरम येथील जिमी जॉर्ज स्पोर्ट्स हब स्विमिंग पूल येथे ऑल इंडिया स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ द डेफद्वारे आयोजित आणि केरळ स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ द डेफ आयोजित २६ व्या राष्ट्रीय मूकबधिर वरिष्ठ जलतरण स्पर्धेत यश संपादन केले.

आहिल शेखने गोवा स्पोर्ट्स कौन्सिल फॉर द डेफचे प्रतिनिधीत्व केले आणि उत्कृष्ट कामगिरी केली.

१५०० मी. फ्रीस्टाइल मध्ये सुवर्णपदक, ८०० मी. फ्रीस्टाइलमध्ये सुवर्णपदक, ४०० मी.फ्रीस्टाइलमध्ये सुवर्णपदक, २०० मी. फ्रीस्टाइल (नवीन राष्ट्रीय मीट रेकॉर्ड) मध्ये सुवर्णपदक तर १०० मी. बटरफ्लायमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. त्याने एकूण ४ सुवर्ण पदके तर १ कांस्य पदक असे मिळून एकूण ५




पदके प्राप्त केली. त्याच्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.आहिलचे अथक समर्पण आणि पोहण्याची आवड, त्याचे प्रशिक्षक, सुजित टी. ए. यांच्या खेलो इंडिया स्टेट सेंटरच्या मार्गदर्शनाखाली जोपासली गेली आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुसकर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 212 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .